# सारांश

---


प्रस्तुत शोधप्रबंधात प्रामुख्याने सात प्रकरणांची योजना केलेली असून पहिल्या प्रकरणातून संशोधकाने विषय निवडीमागील भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच या संशोधनातून कोणकोणती उद्दिष्टे साध्य केली जाणार आहेत?, त्याची समाजोपयोगीता काय? त्याचबरोबर संशोधनाची मर्यादा व व्याप्ती स्पष्ट केलेली असून पूर्व संशोधनाचा आढावाही घेण्यात आला आहे. या संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धती व तंत्रे स्पष्ट केली आहेत. डांग जिल्ह्याचा संबंध परिचयही याच प्रकरणात करून देण्यात आला आहे.

दुसऱ्या प्रकरणाच्या माध्यमातून संशोधकाने लोकसाहित्याच्या विविध संज्ञा, संकल्पना समजून घेतल्या आहेत. विविध अभ्यासकांची मते जाणून घेऊन पुढच्या अभ्यासाची भक्कम बाजू तयार केली आहे. यातून विविध अभ्यासक-संशोधकांनी मांडलेले सिद्धांत, निर्माण केलेल्या संज्ञा व संकल्पना, विविध अभ्यास पद्धती, एकमेकांवर केलेले आरोप प्रत्यारोप, त्यातून निघालेले निष्कर्ष या सगळयांचा धांडोळा घेत घेत संशोधक पुढे गेला आहे.

खऱ्या अर्थाने संशोधन कार्य तिसऱ्या प्रकरणापासून सुरु झालेले असून यामध्ये अनेक लोककथांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये देवकणसराची लोककथा, देवटाफरा आणि निळपसौर यांची लोककथा, धनसऱ्या आणि कनसऱ्याची लोककथा, होली आणि होलाची लोककथा, जळींतकाराची लोककथा, सतरपती पाटलाची लोककथा या प्रमुख लोककथांचा येथे विचार केला गेला आहे. या लोककथांतून डांगी आदिवासींच्या भावभावनांचे प्रकटन सहज झालेले दिसून येते. वेगवेगळया कल्पना, निर्माण केलेली वेगवेगळी प्रतीके यांचा मोठा भरणा या लोककथांतून दिसून येतो. पृथ्वीबरोबर मानवाची, इतर प्राण्यांची, कीटकांची कशी निर्मिती झाली? त्याला कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या? या सगळयांचा धांडोळा या लोककथा घेतांना दिसतात.

चौथ्या प्रकरणामध्ये लोकगीतांचा अभ्यास करण्यात आला आहे. ही लोकगीते डांग जिल्ह्यातील आणि डांगी बोली बोलणाऱ्या व्यक्तींकडून जरी गायली जात असली तरी ती अस्सल मराठी वळणाची आहेत असे ही लोकगीते ऐकल्यानंतर लक्षात येते. अर्थात ही लोकगीते समजून घेण्यासाठी, त्यांचा योग्यतो अर्थ लावण्यासाठी डांग जिल्ह्यातील लोकसंस्कृती आधी समजून घेतली पाहिजे. तरच ह्या लोकगीतांचा नीट अर्थ लागू शकतो. परिसरातील अनेक घटना प्रसंग या लोककथा आणि लोकगीतांतून गुंफलेले असतात. येथील आदिवासी स्त्रियांच्या भावभावनांच्या नाजूक छटा यातून उमलतांना दिसतात. स्त्रियांच्या लोकगीतांतून सांसारिक घटना प्रसंग, कोमल भाव, दुःख, आपुलकी, सहानुभूती, जगण्याची जिद्द, जबाबदारी दिसून येते. तर पुरुषांच्या लोकगीतांतून परिसरातील स्थळ महात्म्य, गायी-गुरांना दिलेले देवत्व दिसून येते.

पाचवे प्रकरण डांग जिल्ह्यातील म्हणी, उखाणे-आहाणे व वाक्प्रचार यांच्यावर आधारित असून त्यातून कधी विनोद तर कधी जीवनातील सत्य मार्मिक आणि मोजक्या शब्दात दिग्दर्शित केलेले दिसते. यातून कधी कधी अतिशयोक्तीही झालेली दिसून येते. ही अतिशयोक्ती बहुतेकदा हास्यविनोद निर्माण करण्यासाठी योजलेली युक्ती असते. म्हणी किंवा वाक्प्रचार आकाराने लहान असले तरी त्यात जीवनातील मोठे सत्य उलगडण्याची ताकद असते. ही ताकद माणसाला जीवन जगण्यासाठी प्रेरणा देते. गतजीवनात घडलेल्या अनेक घटनांचा त्यात साठलेला अनुभवांश असतो. हा अनुभवांश येणाऱ्या पिढीला प्रेरणा देत त्यांचे जीवन समृद्ध करत असतो. प्रस्तुत प्रकरणातील विविध म्हणी, उखाणे-आहाणे व वाक्प्रचार यांचे आकलन केले असता आपल्याला त्याची सत्यता पटते.

सहावे प्रकरण हे लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या यांच्यावर आधारित असून त्यातून डांग जिल्ह्यात प्रचलित असलेल्या त्या त्या घटकानुसार अनेक लोकसमजुती नमूद केलेल्या आहेत. डांगी आदिवासी अनेक लोकसमजुतींना आपलेसे करून त्यातून आपले जीवन समृद्ध करू पाहात आहे. या लोकसमजुतींच्या आधारे आपल्या जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत आहे. त्यातून आपल्याला सुख, समाधान लाभेल अशी आशा त्यांच्या ठिकाणी दिसून येते. या सगळया लोकप्रथा, लोकभ्रम, लोकश्रद्धा आणि लोकविद्या यांच्या मागे भीती आणि आशा दडलेल्या आहेत. भीती याच्यासाठी की, आपल्या जीविताला काही बाधा पोहोचू नये आणि आशा याच्यासाठी की, आपले जीवित कार्य सफल, समृद्ध आणि समाधानकारक रीतीने व्यतीत व्हावे. थोडक्यात आपल्याला सुख प्राप्त व्हावी ही आशा या लोकसमजुतींच्या मागे असलेली दिसून येते.

सातवे प्रकरण हे डांगी बोलीवर अवलंबून असून त्यातून डांग जिल्ह्यात बोलली जाणारी डांगी बोली कशी आहे? तिचे स्वरूप काय? तिच्यावर कोणकोणत्या बोली-भाषांचा प्रभाव आहे? तिच्या अंतर्गत बोलींचे स्वरूप काय? आणि कसे आहे? त्या संदर्भात विविध अभ्यासकांचे मत काय? या सगळयांचा धांडोळ ग्रिअर्सनपासून आतापर्यंत वेगवेगळया घटकांना अनुसरून घेण्यात आला आहे. यातून समग्र डांगी बोलीचे आकलन होईल अशी आशा आहे.

या प्रत्येक प्रकरणाचा यथासांग अभ्यास केल्यानंतर त्यातून काही निष्कर्ष अभ्यासकाच्या हाती आले आहेत. या सगळ्या निष्कर्षांचा समावेश प्रकरण आठव्यामध्ये केलेला असून हे निष्कर्ष प्रत्येक प्रकरणानुसार वेगवेगळे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

शेवटी परिशिष्ट जोडले आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, साधन व्यक्ती, विविध नकाशे, छायाचित्रे आणि पुढील संशोधनाच्या दिशा दर्शविल्या आहेत.

*****